महाराष्ट्र शासन
वनविभाग

दूरध्वनी क्र.०७१२-२५५१६२३.
Email ID : pccflegalcell@gmail.com

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय
वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर ४४० ००१

---

ईमेलद्वारे/न्यायालयीन प्रकरण

क्र.कक्ष-३१/विधी/प्र क्र.५५/२०-२१/ 74 /२४-२५ नागपूर, दिनांक 23/०४/२०२४

प्रति,
मुख्य वन संरक्षक (प्रादेशिक),
नाशिक वनवृत्त

32
५१४२५

विषय- मुळ अर्ज क्र.२३८, २३९, २४२, २४३, २४५, २४६, २४८ व २४९/२०२० मध्ये मा. न्यायाधिकरणाचे दिनांक १५/३/२०२४ रोजीच्या आदेशाबाबत
श्री. ज्ञानेश्वर जगन्नाथ सोनवणे विरुध्द महाराष्ट्र शासन व ईतर

संदर्भः १.आपलेकडील पत्र क्र.कक्ष-१/आस्था/एमपी/१०७९/ २०-२१, दिनांक २९/०१/२०२१ P 161
२. या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-३१/विधी/प्र.क्र.५५/२०-२१/४४९, दि.२३/२/२०२१ P-189
३. शासन पत्र क्र. एस-३०/०३/२१/प्र.क्र.९६/फ-४, दि.२६/३/२०२१ P.193
४.आपलेकडील पत्र क्र.कक्ष-१/आस्था/एमपी/२१, दिनांक ०५/०४/२०२४ P-367

श्री. ज्ञानेश्वर जगन्नाथ सोनवणे व ईतर ,वनरक्षक यांची आंतरवृत्तीय बदली व पदस्थापना करण्यात आली होती. तथापि त्यांनी नियुक्ती तारखेपासुन सेवा जेष्ठता मिळण्यासंदर्भात मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे मुळ अर्ज क्रमांक २३८,२३९, २४२, २४३, २४४, २४५, २४६, २४८ व २४९/२०२२० दाखल केला होता. मा. न्यायाधिकरणाने दिनांक १५/३/२०२४ रोजी अर्जदार यांचे बाजूने एकत्रितरित्या निर्णय पारीत केला आहे.

मा. न्यायाधिकरणाचे वरील आदेशास अनुलक्षून शासकिय अभियोक्ता, मॅट, औरंगाबाद यांचे आपलेस्तरावरून अभिमत घेण्यात आले असून त्यांनी सदर प्रकरण अपील दाखल करण्यास योग्य नसल्याबाबत अभिमत दिले आहे.तथापि जर अपल दाखल न करता मा. न्यायाधिकरणाने दिलेल्या निर्णयची अंमलबजावणी जर केली तर याचा संपुर्ण महाराष्ट्र राज्यातील वनरक्षक यांचे सेवाजेष्ठतेवर परिणाम होईल. त्यानुसार मा. न्यायाधिकरणाने दिलेल्या निर्णयाविरुध्द मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे अपील दाखल करणेकामी मंजूरी मिळणेस आपलेकडील संदर्भिय पत्र क्र.४ अन्वये विनंती करण्यात आलेली आहे.

त्यानुषंगाने कळविण्यात येते की, अशाच समान प्रकरणी वनरक्षकांची आंतरवृत्तीय बदली केल्यानंतर ज्या वनवृत्तात बदली झालेली आहे त्या वनवृत्तात शुन्य जेष्ठतेवर ठेवण्यात येते. याबाबत श्री. नितीन गडपायले व ईतर वनरक्षक यांनी मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, नागपूर येथे मुळ अर्ज क्रमांक ५४५/२०१५, ७६१/२०१५, ८०२/२०१५, ८०५/२०१५ व ९७/२०१६ दाखल केले होते. त्यात मा. न्यायाधिकरणाने दिनांक ०६/१/२०१७ रोजी अर्जदार यांचे बाजूने निर्णय देवून प्रकरण निकाली काढले होते.

सदरहू आदेशा विरोधात श्री. बाबा नैताम व इतर यांनी मा. मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे रिट याचिका क्रमांक ७६८३/२०१८ तसेच त्याअंतर्गत सिव्हील अप्लीकेशन क्रमांक २७३४/२०१९

दाखल केली आहे. मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी दाखल केलेली रिट याचिका क्रमांक ७६८३/२०१८ व सिव्हील अप्लीकेशन क्रमांक २७३४/२०१९ मध्ये दिनांक ४/३/२०२१ रोजी अंतरिम आदेश पारीत केलेला आहे. सदर आदेशामध्ये खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आले आहे.

*"3. It was the case of the Petitioner before the Tribunal that they have been promoted as Foresters and the Respondents- Original Applicants while seeking transfer from one Circle to another had accepted a condition that they will be placed at the bottom of the Seniority list. The Petitioners had contended before the Tribunal that Rule 4(2)(c) of the Maharashtra Civil Services (Regulation of Seniority) Rules, 1982 permits the seniority of a transferred Government Servant to be determined by the Competent Authority and in exercise of this power that the stipulation was incorporated, which the Respondents- Original Applicants never contested.*

*4. It was also the case of the Petitioners, which was specifically taken in their reply, that the Recruitment Rules framed on 29 October 1987 under Article 309 of the Constitution of India as regards appointment to the post of Forester state that promotion of suitable person should be from Circle Gradation list. Petitioners contended that there are various Circles within the Respondent- Forest Department and as much as 11 Circles have published their own Seniority list.*

*5. This specific ground raised by the Petitioners is not considered by the Tribunal at all. If the recruitment Rules indicate that promotion should be within Circle then the discussion would have to proceeded in different direction.*

*6. In view of the position and that the Petitioners are already promoted, case for issuance of Rule is made out.*

*7. Rule. Respondents waives service of notice. Ad-interim order granted earlier to continue as interim relief. Liberty to apply for an early date.*

***CIVIL APPLICATION No. 2734 of 2019***

*In view of the order passed today in the Writ Petition, Civil Application does not survive, and is disposed of."*

आंतरवृत्तीय बदली संदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी पारीत केलेले आदेश समान प्रकरणी उपयोगी पडणारे आहेत. यास्तव मा.उच्च न्यायालयाचे दिनांक ४/३/२०२१ रोजी पारीत केलेल्या निकालाची छायाप्रत या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-३१/विधी/प्र.क्र.६९/१८-१९/११७, दिनांक २५/६/२०२१ अन्वये मुख्य वनसंरक्षक/ वनसंरक्षक (प्रा) (सर्व) यांना माहितीकरिता पाठविण्यात आलेली आहे (छायाप्रत संलग्न). मा. मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल रिट याचिका क्रमांक ७६८३/२०१८ अद्यापही न्यायप्रविष्ठ आहे.

त्यामुळे उपरोक्त बाब मा. न्यायाधिकरणाचे निदर्शनास आणून देण्यात आली नसल्याने मा. न्यायाधिकरणाने तसे आदेश पारीत केल्याचे दिसून येत आहे. तसेच या प्रकरणी मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी दाखल केलेली रिट याचिका क्रमांक ७६८३/२०१८ व सिव्हील अप्लीकेशन क्रमांक २७३४/२०१९ मध्ये दिनांक ४/३/२०२१ रोजी पारीत केलेल्या अंतरिम आदेश प्रत जे या कार्यालयामार्फत दिनांक २५/६/२०२१ रोजीच्या पत्रान्वये आपणांस पाठविण्यात आली आहे, ते सादरकर्ता अधिकारी, मॅट, औरंगाबाद यांचे निदर्शनास आणून न दिल्यामुळे त्यांचेकडून विपरीत अभिमत दिल्याचे दिसून येत आहे.

समान प्रकरणात मा.मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे रिट याचिका क्रमांक ७६८३/२०१८ प्रकरण न्यायप्रविष्ठ असल्याने पुन्हा प्रकरणी आपण केलेल्या विनंतीनुसार अपील दाखल

करण उचित होणार नाही असे या कार्यालयाचे मत आहे. तथापि वनविभागाचे वतीने तात्काळ मा. न्यायाधिकरणाकडे Review Application दाखल करणे अपेक्षित आहे.

करिता प्रस्तुत प्रकरणाचे अनुषंगाने रिट याचिका क्रमांक ७६८३/२०१८ व सिव्हील अप्लीकेशन क्रमांक २७३४/२०१९ मध्ये दिनांक ४/३/२०२१ रोजी पारीत केलेल्या अंतरिम आदेश प्रत सादरकर्ता अधिकारी, मॅट, औरंगाबाद यांचे निदर्शनास आणून त्यांचे पुन्हा अभिमत घेण्यात येवून वनविभागाचे वतीने मा. न्यायाधिकरणाकडे Review Application चा मसुदा तयार करून आपले स्वयंस्पष्ट अभिप्रायासह या कार्यालयास मान्यतेस्तव तात्काळ सादर करावा.

सहपत्र: वरीलप्रमाणे

| टिप्पणी प्र.मु.व.सं.(वनबल प्रमुख),म.रा.यांचेकडून अनुमोदित |
|---|

(शोमीता बिश्वास)
अपर प्रधान मुख्य वन संरक्षक
(प्रशासन-दुय्यम संवर्ग)

प्रतिलिपी – (ईमेलव्दारे)

1) प्रधान सचिव (वने),महसूल व वनविभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांना मा. न्यायाधिकरणाचे दिनांक १५/३/२०२४ रोजीच्या आदेशाच्या छायाप्रतीसह माहितीस्तव सादर.

2) कक्ष अधिकारी, कक्ष-१०, प्रस्तुत कार्यालय यांना मा. न्यायाधिकरणाचे दिनांक १५/३/२०२४ रोजीच्या आदेशाच्या छायाप्रतीसह माहितीस्तव अग्रेषित.